साप्ताहिक

# तेरणा वृत्तांत

धाराशिव | अंक - २९ | सोमवार, ३० मार्च २०२६ | RNI NO. MHMAR/25/A0338 | पाने ४ | किंमत ५ रुपये



# धाराशिव जिल्हा भगवामय!

## रामनवमी निमित्त भव्य भगवा ध्वज यात्रांनी दुमदुमला जिल्हा

**धाराशिव : रामनवमीच्या पावन पर्वानिमित्त संपूर्ण धाराशिव जिल्ह्यात भक्तिमय आणि उत्साही वातावरणात भगवा ध्वज यात्रांचे आयोजन करण्यात आले. 'जय श्रीराम' च्या घोषणांनी जिल्हाभर वातावरण दुमदुमून गेले असून, हजारो रामभक्तांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.**

जिल्ह्यातील विविध शहरांमध्ये निघालेल्या या यात्रांमध्ये महिला भगिनी, युवक, तसेच चिमुकल्यांचा मोठ्या संख्येने सहभाग दिसून आला. डोक्यावर भगवे फेटे आणि हातात भगवे ध्वज घेऊन नागरिकांनी भक्तिभावाने सहभाग घेतला.

### धाराशिव शहरात उत्साहाचा शिखर

धाराशिव शहरात छत्रपती शिवाजी महाराज चौक ते राम मंदिरापर्यंत भव्य ध्वज यात्रा काढण्यात आली. या यात्रेत आमदार राणाजगजितसिंह पाटील, जिल्हा परिषद अध्यक्ष अर्चना पाटील, नगराध्यक्ष नेहा राहुल काकडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

### परंडा शहरात भव्य शोभायात्रा


परंडा शहरात महाराणा प्रताप चौकातून सुरू झालेली ध्वज यात्रा 'जय श्रीराम' च्या जयघोषात राम मंदिरापर्यंत पोहोचली. यात्रेत सहभागी प्रत्येकाच्या हातात भगवा ध्वज आणि डोक्यावर भगवा फेटा होता. माजी आमदार सुजितसिंह ठाकूर, युवानेते मल्हार पाटील, जिल्हा परिषद सदस्य धनंजय सावंत यांच्यासह हजारो नागरिक सहभागी झाले.

### कळंबमध्ये भक्तिमय वातावरण

कळंब शहरात टाळ-मृदुंगाच्या गजरात आणि भक्तिमय वातावरणात ध्वज यात्रा उत्साहात पार पडली. 'जय श्रीराम'च्या घोषणांनी शहर दुमदुमले. भाजप जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी, शिवसेना जिल्हाप्रमुख अजित पिंगळे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

### नळदुर्ग, उमरगा, लोहारा येथेही उत्सवाचा जल्लोष

नळदुर्ग, उमरगा आणि लोहारा शहरांमध्येही रामनवमी निमित्त भव्य शोभायात्रा काढण्यात आली. उमरगा शहरात हर्षवर्धन चालुक्य, मल्हार पाटील यांच्या उपस्थितीत हजारो रामभक्तांनी सहभाग घेतला. छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करुन यात्रेची सुरुवात करण्यात आली. जयघोष, आतिषबाजी आणि भक्तिमय वातावरणात यात्रा पार पडली. श्रीराम मंदिरात आरती करून यात्रेचा समारोप करण्यात आला. एकूणच, रामनवमीच्या निमित्ताने धाराशिव जिल्हा रामभक्तीने आणि भगव्या उत्साहाने न्हाऊन निघाल्याचे चित्र पाहायला मिळाले.





लोहारा



कळंब








परंडा



कळंब



धाराशिव



उमरगा

# दंडकारण्यातला धाराशिव! रामाच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या भूमीची कहाणी

**भारतीय संस्कृतीत 'श्री राम' हे केवळ एक देवत्व नसून आदर्श जीवनमूल्यांचे जिवंत प्रतीक आहेत. सत्य, धर्म, कर्तव्यनिष्ठा, आदर्श पुत्र, आदर्श राजा, आदर्श पती आणि आदर्श मानव म्हणून श्री राम भारतीयांच्या हृदयात कायमचे कोरले गेले आहेत. हजारो वर्षांपासून भजन, कीर्तन, प्रवचन, कथा, महाकाव्ये आणि लोकपरंपरेतून श्री रामांची गाथा अखंडपणे जनमानसात रुजत आली आहे.**



जयराज खोचरे

इतिहास व पुरातत्व अभ्यासक

गोस्वामी तुलसीदासांनी रामचरितमानस मध्ये श्री रामाचे अत्यंत सुंदर आणि जिवंत वर्णन केले आहे. बालकांडामध्ये ते सांगतात की, रामाचा वर्ण हा जलाने भरलेल्या मेघासारखा श्यामवर्णी आहे. त्यांचे केस कुरळे, मुखकमल तेजस्वी आणि बाल्यावस्थेतही तेज व सौंदर्याने परिपूर्ण असे त्यांचे रूप आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात करुणा, शौर्य आणि विनय यांचा अद्भुत संगम दिसतो.

श्री राम म्हणजे मर्यादा पुरुषोत्तम. 'मर्यादा' म्हणजे आचारसंहिता आणि 'पुरुषोत्तम' म्हणजे सर्वोत्तम मानव. त्यांनी आयुष्यभर धर्माचे पालन करत, संकटातही कर्तव्याचा मार्ग न सोडता आदर्श घालून दिला. म्हणूनच राम हा केवळ धार्मिक श्रद्धेचा विषय नाही, तर तो जीवन जगण्याची पद्धत आहे. अयोध्येपासून कन्याकुमारीपर्यंत, हिमालयापासून समुद्रापर्यंत भारतात श्री रामाची मंदिरे आढळतात. प्रत्येक प्रदेशात रामकथेचे वेगळे रंग, परंपरा आणि लोककथा दिसतात. उत्तर भारतात रामलीला, दक्षिण भारतात कंब रामायण, महाराष्ट्रात कीर्तन आणि हरिकथा या माध्यमांतून रामकथा लोकांपर्यंत पोहोचली. महाराष्ट्रात समर्थ रामदास स्वामींनी 'जय जय रघुवीर समर्थ' या घोषणेद्वारे रामभक्तीला नवे बळ दिले. छत्रपती शिवाजी महाराजांनाही रामाच्या आदर्शांचा मोठा प्रभाव होता. रामराज्य ही संकल्पना आजही उत्तम प्रशासनाचे प्रतीक मानली जाते.

### धाराशिव जिल्हा आणि रामायणकालीन संदर्भ

धाराशिव जिल्ह्याचा इतिहास रामायण काळाशी जोडलेला असल्याचे अनेक लोककथा आणि संदर्भ सांगतात. रामायणात उल्लेख असलेले 'दंडकारण्य' हे विस्तीर्ण जंगल क्षेत्र होते, ज्यामध्ये विदर्भ, ऋषिक आणि माहिषक देशांचा समावेश होता. याच माहिषक प्रदेशात आजचा धाराशिव, रायचूर, गुलबर्गा आणि बिदर हे भाग येतात, असे मानले जाते.

वानरराज सुग्रीवारने सीतेच्या शोधासाठी वानर सेनेला ज्या प्रदेशात पाठवले, त्या भागात हा परिसर समाविष्ट होता. त्यामुळे रामाच्या वनवासातील प्रवासात या प्रदेशाचा संबंध असल्याचे सांगितले जाते.

धाराशिव जिल्ह्यातील येडेश्वरी देवीचे स्थान अत्यंत प्राचीन आणि पौराणिक मानले जाते. लोककथेनुसार, देवी पार्वतीने श्री रामाची परीक्षा घेण्यासाठी सीतेचे रूप धारण केले होते. त्या वेळी श्री रामांनी तिला ओळखून 'आई, तू वेडी आहेस का?' असा उल्लेख केल्याने 'येडेश्वरी' हे नाव रूढ झाले, असे सांगितले जाते.

तसेच 'तुकाई', 'येडाई' अशीही या देवीची विविध नावे कालांतराने प्रचलित झाली. या सर्व कथांमधून रामायणातील प्रसंग आणि स्थानिक श्रद्धा यांचा सुंदर संगम दिसून येतो.

### तुळजापूरची रामवरदायिनी देवी

तुळजापूरची श्री तुळजाभवानी देवी ही महाराष्ट्रातील अत्यंत प्रसिद्ध शक्तीपीठ आहे. लोकमान्य परंपरेनुसार, देवीने श्री रामाला लंकेचा मार्ग दाखवून विजयाचे वरदान दिले. त्यामुळे देवीला 'रामवरदायिनी' असेही संबोधले जाते. तुळजापूर येथे या नावाचे स्वतंत्र मंदिर आहे.

ज्या ठिकाणाहून देवीने मार्गदर्शन केले, त्या ठिकाणी घाटशिळ मंदिर उभारण्यात आले आहे. या सर्व स्थळांमुळे रामायणकालीन घटनांचा ठसा या भूमीवर उमटलेला दिसतो.

### रामलिंग, जटायू आणि इतर स्थळे

धाराशिव जिल्ह्यातील 'रामलिंग' हे स्थान जटायूच्या समाधीशी संबंधित मानले जाते. जटायूने सीतेच्या रक्षणासाठी रावणाशी युद्ध केले आणि वीरमरण पत्करले. त्या घटनेची आठवण या स्थळातून जपली जाते.तसेच 'सीतेचे न्हाणी' आणि 'रामकुंड' ही स्थळेही विविध भागात आढळतात. या सर्व ठिकाणांवरून हा प्रदेश राम ाच्या वनवासाच्या मार्गावर होता, असे स्थानिक परंपरेत मानले जाते.

### धाराशिवमधील राममंदिरे आणि वैशिष्ट्ये

धाराशिव शहरातील कसबा भागात दोन प्राचीन राममंदिरे आहेत. नळदुर्ग येथे 'रामतीर्थ' हे महत्त्वाचे धार्मिक स्थळ आहे. तुळजापूर आणि नळदुर्ग येथील काही राममंदिरे घुमटाकार असून मध्ययुगीन स्थापत्यशैलीची उदाहरणे आहेत.

उपळा (दुमाला) येथे लक्ष्मण, हनुमान आणि भरत यांच्या मूर्ती एकत्र असलेले अद्वितीय मंदिर आहे, जे अत्यंत दुर्मिळ मानले जाते.तेरजवळील हिंग्लज माता मंदिराच्या समोरील पंचायतन महादेव मंदिरात एक अद्भुत शिल्प आहे. या शिल्पात गरुड विष्णू-लक्ष्मीला घेऊन जात आहे आणि श्री हनुमान त्यांना नम्रतेने वाकून वंदन करत आहेत.ही शिल्पकल्पना रामाला विष्णूचा अवतार मानण्याच्या श्रद्धेचे प्रतीक आहे. अशा कलाकृती धार्मिक विचारसरणी आणि शिल्पकलेचा उत्कृष्ट मिलाफ दर्शवतात.

### समर्थ रामदास स्वामी आणि कल्याण स्वामी

समर्थ रामदास स्वामी हे महाराष्ट्रातील रामभक्तीचे प्रमुख प्रवर्तक होते. त्यांच्या शिष्यांपैकी श्री कल्याण स्वामी हे अत्यंत प्रसिद्ध होते. परंडा जवळील डोमगाव येथे त्यांचे समाधी मंदिर आहे. कल्याण स्वामींचे पूर्ण नाव अंबाजी कृष्णाजी कुलकर्णी असे होते. त्यांनी समर्थ रामदासांनी सांगितलेला 'दासबोध' ग्रंथ लिहून ठेवला. त्या ग्रंथाची आद्य प्रत आजही डोमगाव येथे जतन करण्यात आली आहे. त्यांनी सीना नदीला 'श्रमहरिणी' असे नाव दिले आणि तिची आरतीही रचली. इ. स. १७१४ मध्ये त्यांनी देह ठेवला. त्यांच्या कार्यामुळे धाराशिव परिसरात रामभक्तीचा मोठा प्रसार झाला.

धाराशिव जिल्हा हा केवळ ऐतिहासिक आणि धार्मिक स्थळांचा प्रदेश नाही, तर रामायणाशी जोडलेल्या परंपरा, श्रद्धा आणि लोककथांचा जिवंत वारसा आहे. येथील प्रत्येक मंदिर, प्रत्येक कथा आणि प्रत्येक स्थळ रामभक्तीची साक्ष देत आहे. रामनवमीच्या निमित्ताने आपण सर्वांनी श्री रामांच्या आदर्शांचा अंगीकार करून समाजात सदाचार, प्रेम आणि एकात्मता वाढवण्याचा संकल्प करावा.

**जय श्री राम! आपणा सर्वांना रामनवमीच्या हार्दिक शुभेच्छा:!**

तेरणा वृत्तांत

# संपादकीय

## अपारंपरिक ऊर्जास्त्रोतांचा वापर : काळाची गरज आणि भारताची दिशा

जागतिक पातळीवर सध्या अस्थिरतेचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेषतः इस्रायल-इराण संघर्षामुळे मध्यपूर्वेतील तणाव वाढला असून त्याचा थेट परिणाम जागतिक इंधन पुरवठ्यावर होताना दिसत आहे. कच्च्या तेलाच्या किमतीत होणारा चढ-उतार, पुरवठा साखळीतील अडथळे आणि त्यातून निर्माण होणारी अनिश्चितता यामुळे अनेक देशांमध्ये चिंता वाढली आहे. भारतासारख्या मोठ्या लोकसंख्या असलेल्या आणि इंधनासाठी आयातीवर अवलंबून असलेल्या देशासाठी ही परिस्थिती अधिक गंभीर आहे. जरी भारताकडे पुरेसा इंधनसाठा उपलब्ध असला, तरीही अफवा, भीती आणि संभाव्य टंचाईची चर्चा यामुळे नागरिकांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली आहे.

ही परिस्थिती केवळ तात्पुरती समस्या नाही, तर दीर्घकालीन धोरणात्मक विचार करण्याची गरज अधोरेखित करते. आजचा प्रश्न केवळ पेट्रोल, डिझेल किंवा गॅसपुरवठ्याचा नाही; तर ऊर्जासुरक्षेचा आहे. आणि याच पार्श्वभूमीवर अपारंपरिक ऊर्जास्त्रोतांकडे वळणे ही केवळ पर्यायाची बाब नसून अपरिहार्यता बनली आहे.

भारत सध्या आपल्या ऊर्जा गरजांपैकी मोठा हिस्सा आयातीतून भागवतो. विशेषतः कच्च्या तेलासाठी आपण म ध्यपूर्वेवर मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहोत. अशा वेळी त्या प्रदेशात कोणताही संघर्ष उद्भवल्यास त्याचा थेट परिणाम आपल्या अर्थव्यवस्थेवर होतो. पेट्रोल-डिझेलच्या किमती वाढतात, वाहतूक खर्च वाढतो, महागाई वाढते आणि शेवटी सामान्य नागरिकाच्या खिशावर ताण येतो.

याशिवाय पारंपरिक ऊर्जास्त्रोतांचे पर्यावरणीय परिणाम ही गंभीर आहेत. कोळसा, पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू यांच्या ज्वलनामुळे कार्बन उत्सर्जन वाढते, ज्यामुळे हवामान बदलाचा धोका अधिक तीव्र होतो. जागतिक तापमानवाढ, अनियमित पाऊस, दुष्काळ आणि पूर यांसारख्या समस्यांचा सामना आपण आधीच करत आहोत.

अपारंपरिक ऊर्जास्त्रोत म्हणजे सौर ऊर्जा, वारा ऊर्जा, जलविद्युत, जैवऊर्जा आणि अलीकडे वाढत असलेली हायड्रोजन ऊर्जा. हे स्त्रोत अक्षय आहेत, म्हणजे ते संपत नाहीत आणि पर्यावरणासाठी तुलनेने सुरक्षित आहेत.

सौर ऊर्जा हा भारतासाठी सर्वात मोठा आणि व्यवहार्य पर्याय आहे. ग्रामीण भागात सौर पॅनेलद्वारे वीज निर्मिती केल्यास केवळ ऊर्जा स्वावलंबनच नाही, तर आर्थिक विकासालाही चालना मिळू शकते. घरांच्या छतांवर सोलर पॅनेल बसवणे, सरकारी इमारतींमध्ये सौर ऊर्जा वापरणे आणि शेतीसाठी सोलर पंपांचा वापर वाढवणे यामुळे पारंपरिक वीजेवरील ताण कमी होऊ शकतो.

वाहतूक क्षेत्रात पेट्रोल-डिझेलचा सर्वाधिक वापर होतो. अशा वेळी इलेक्ट्रिक वाहनांचा (EV) वापर वाढवणे अत्यंत गरजेचे आहे. भारतात इलेक्ट्रिक दुचाकी, तीनचाकी आणि चारचाकी वाहनांची मागणी हळूहळू वाढत आहे. सरकारने दिलेल्या अनुदानामुळे आणि वाढत्या जागरूकतेमुळे हा बदल अधिक वेगाने होऊ शकतो. जर मोठ्या प्रमाणावर एत स्वीकारले गेले, तर इंधन आयातीत मोठी बचत होईल आणि पर्यावरणीय प्रदूषणही कमी होईल.

महाराष्ट्रासह अनेक राज्यांमध्ये वारा ऊर्जेसाठी अनुकूल क्षेत्रे आहेत. किनारपट्टी भागात आणि पठारावर वारा ऊर्जा प्रकल्प उभारता येऊ शकतात. तसेच शेतीतील अवशेषांपासून जैवऊर्जा निर्माण करून ग्रामीण भागात ऊर्जा स्वावलंबन साधता येईल.


अपारंपरिक ऊर्जेचा व्यापक वापर करण्यासाठी केवळ धोरणे पुरेशी नाहीत; तर संशोधन आणि तंत्रज्ञान विकास आवश्यक आहे. सौर पॅनेल अधिक कार्यक्षम कसे बनवता येतील, बॅटरी स्टोरेज अधिक स्वस्त आणि टिकाऊ कसे करता येईल, हायड्रोजन इंधन कसे विकसित करता येईल यावर भर देणे आवश्यक आहे.

भारताने 'मेक इन इंडिया' आणि 'आत्मनिर्भर भारत' या संकल्पनांनुसार ऊर्जा क्षेत्रातही स्वावलंबन साधणे गरजेचे आहे. जर आपण स्वतःचे तंत्रज्ञान विकसित केले, तर आयातीवरील अवलंबित्व कमी होईल आणि रोजगारनिर्मितीही वाढेल.

या अनुषंगाने सरकारने आधीच काही महत्त्वाची पावले उचलली आहेत. सौर ऊर्जा प्रकल्पांसाठी अनुदान, इलेक्ट्रिक वाहनांसाठी प्रोत्साहन योजना, चार्जिंग स्टेशनची उभारणी, आणि नवीकरणीय ऊर्जेसाठी लक्ष्य निश्चित करणे ही त्यातील काही उदाहरणे आहेत. तथापि, या योजनांची प्रभावी अंमलबजावणी होणे अत्यंत महत्त्वाचे आहे. ग्रामीण भागात जनजागृती करणे, शेतकऱ्यांना सौर पंपासाठी मदत करणे, आणि लघुउद्योगांना नवीकरणीय ऊर्जा वापरण्यास प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. ऊर्जा संक्रमण हा केवळ सरकारचा विषय नाही; तर प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. घरांमध्ये ऊर्जा बचत करणे, सौर ऊर्जा वापरणे, शक्य असल्यास इलेक्ट्रिक वाहनांचा वापर करणे आणि अनावश्यक इंधन वापर टाळणे या छोट्या गोष्टी मोठा बदल घडवू शकतात. अफवांवर विश्वास ठेवून इंधन साठवण्यापेक्षा संयम ठेवणे आणि जबाबदार वर्तन करणे अधिक गरजेचे आहे. कारण अशा अफवांमुळे कृत्रिम टंचाई निर्माण होऊ शकते.

भारताने जर दीर्घकालीन ऊर्जा धोरण आखले, तर तो ऊर्जा क्षेत्रात स्वावलंबी होऊ शकतो. अपारंपरिक ऊर्जेचा वापर वाढवून आपण केवळ इंधन आयातीवरील खर्च कमी करू शकत नाही, तर जागतिक स्तरावर पर्यावरण संरक्षणातही मोठे योगदान देऊ शकतो. आज इस्रायल-इराण संघर्षामुळे निर्माण झालेली परिस्थिती ही आपल्यासाठी एक इशारा आहे. भविष्यात अशा संकटांना तोंड देण्यासाठी आपण आजच तयारी केली पाहिजे.





# धाराशिव जिल्हा परिषदेत महायुतीची वज्रमूठ कायम

**धाराशिव : जिल्हा परिषदेच्या विविध सभापती पदांच्या निवड प्रक्रियेत महायुतीने पुन्हा एकदा आपली भक्कम ताकद दाखवून दिली आहे. जिल्हा परिषद अध्यक्ष व उपाध्यक्ष निवडीनंतर सभापती पदांच्या निवडीतही महायुतीने एकतर्फी विजय मिळवत जिल्हा परिषदेत आपली वज्रमूठ कायम असल्याचे सिद्ध केले.**

## सभापती निवडीतही अभेद्य कामगिरी

शुक्रवारी (ता. २७ मार्च) पार पडलेल्या निवड प्रक्रियेत सर्वच सभापती पदांवर महायुतीच्या उमेदवारांनी निर्विवाद विजय मिळवला. यामध्ये अर्थ व बांधकाम सभापतीपदी नंदगाव गटातील सिद्धेश्वर बळीराम कोरे, महिला व बालकल्याण सभापतीपदी डिकसळ गटातील पूजाताई तुषार शिंदे, कृषी व पशुसंवर्धन सभापतीपदी डोंजा गटातील भाऊसाहेब बाळासाहेब खडसरे, तर समाज कल्याण सभापतीपदी खामसवाडी गटातील विश्वास हनुमंत कोकणे यांची निवड झाली.

या विजयामुळे महायुतीची जिल्ह्यातील एकजूट, संघटनशक्ती आणि विकासाभिमुख भूमिका पुन्हा अधोरेखित झाली आहे. जिल्ह्यातील जनतेने महायुतीवर दाखवलेल्या विश्वासाचा हा परिपाक असल्याची भावना कार्यकर्त्यांमध्ये व्यक्त होत आहे.

दरम्यान, जिल्हा परिषद अध्यक्ष अर्चनाताई पाटील आणि उपाध्यक्ष उषाताई रवींद्र गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यातील ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास अधिक वेगाने होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

पायाभूत सुविधा, शिक्षण, आरोग्य आणि जनतेच्या अपेक्षा पूर्ण करणारे निर्णय प्रभावीपणे घेतले जावेत, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.



## तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या

# विद्यार्थ्याचे गेट २०२६ परीक्षेत उल्लेखनीय यश

**धाराशिव : तेरणा ट्रस्ट संचालित अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या संगणक शास्त्र अभियांत्रिकी (कंप्युटर सायन्स अँड इंजिनीरिंग) विभागात तृतीय वर्षात शिकणाऱ्या समीर मजनू शेख या विद्यार्थ्याने आयआयटी गुवाहाटी आयोजित गेट २०२६ परीक्षेत उल्लेखनीय गुण मिळवून पात्रता यादीत स्थान मिळवले आहे.**

ग्रॅजुएट ॲप्टिट्यूड टेस्ट इन इंजिनीरिंग (GATE) ही अभियांत्रिकी क्षेत्रातील अत्यंत कठीण परीक्षांपैकी एक असून कठिणता पातळीवर देशातील चौथ्या क्रमांकाची परीक्षा मानली जाते. ही परीक्षा आयआयटी, आयआयएससी सारख्या प्रतिष्ठित संस्थांमार्फत घेण्यात येते. अभियांत्रिकी पदवीत्तर शिक्षणासाठी गेटपरीक्षा ही प्रवेशद्वार मानली जाते. तसेच इसरो, बार्क, भेल, भारत इलेक्ट्रॉनिक्स, सीडॅक यांसारख्या नामांकित संस्था संशोधनात्मक कामांसाठी शास्त्रज्ञ व अभियंते यांची निवड गेट गुणांच्या आधारे करतात.

यंदा आयआयटी गुवाहाटीने फेब्रुवारी महिन्यात GATE २०२६ परीक्षा घेतली. या परीक्षेत संगणक शास्त्र व माहिती तंत्रज्ञान (CS) या विषयात समीर शेख याने ३४० गुण मिळवले. तसेच आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड डेटा सायन्स या विषयात २९० गुण मिळवून दोन्ही विषयांमध्ये उल्लेखनीय यश संपादन केले. पुढील उच्च शिक्षण सुरू ठेवल्यास त्यांना दरमहा १२,४०० रुपये विद्यावेतन (स्टायपेंड) मिळणार आहे.

या यशाबद्दल बोलताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विक्रमसिंह माने म्हणाले, 'यापूर्वीही समीर शेख याने कमिन्स कंपनीतर्फे शिष्यवृत्ती बरोबरच विद्यावृत्ती म्हणून लॅपटॉप बक्षीस, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचा सर्वोत्कृष्ट नवोदित संसद सदस्य (**Best Debutant Member of Parliament**) हा पुरस्कार धाराशिव जिल्ह्यासाठी व आयआयटी मुंबई येथील इंटर्नशिपसाठी निवड आशा अनेक उल्लेखनीय कामगिरी केल्या आहेत. त्यामुळे विषयातील सखोल ज्ञान विद्यार्थ्यांना मिळावे, यासाठी संस्थेचा हायर एज्युकेशन सेल तसेच विभाग सातत्याने प्रयत्नशील असतो. समीरचे यश हे या प्रयत्नांचे फलित आहे. समीर हा सातत्याने महाविद्यालयातील सर्व शिक्षकांच्या संपर्कात राहून रात्रंदिवस तंत्रज्ञान शिकण्यासाठी मेहनत करत आहे त्यामुळे तो भविष्यात नक्कीच शासकीय किंवा नामांकित कंपनीमध्ये सर्वोच्च पगारावर मोठ्या हुद्द्यावर याची मला खात्री आहे.'

# नूतन पदाधिकाऱ्यांनी जनतेचा विश्वास सार्थ ठरवावा

## विकासकामांसाठी झोकून देण्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांचे आवाहन



**धाराशिव:** जनतेने जो विश्वास आपल्यावर टाकला आहे, त्यातून आपली जबाबदारी आता कैक पटीने वाढली आहे. या पदाला न्याय देण्यासाठी पूर्णवेळ योगदान देणे ही काळाची गरज असल्याचे असे प्रतिपादन आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी केले आहे. जिल्हा परिषदेच्या नूतन सभासदांचे अभिनंदन करून त्यांनी पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

राज्यात महायुतीचे सरकार असून मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांकडून जिल्ह्याच्या विकासासाठी भरघोस निधी उपलब्ध करून दिला जात आहे. आता जिल्ह्याच्या सत्तेतही आपण सहभागी असल्याने विकासाचा वेग अधिक वाढणार आहे. ग्रामीण भागातील सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी या सत्तेचा सकारात्मक वापर करून जिल्हा स्तरावर काही अडचणी आल्यास आपण स्वतः खंबीरपणे पाठीशी उभा असल्याचेही आमदार पाटील यांनी सांगितले. आता विकास कामे करताना मात्र कोणतीही कसर राहणार नाही याची दक्षता सर्वांनीच घ्यावी असे आवाहनही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी केले आहे.

विरोधकांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न केला, मात्र मतदारांनी विकासाला आणि महायुतीच्या एकजुटीला कौल दिला. जिल्हा परिषद अध्यक्ष-उपाध्यक्ष निवडणुकीप्रमाणेच सभापती पदाच्या निवडणुकीतही म हायुतीची 'वज्रमूठ' अभेद्य असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले असल्याचेही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी म्हटले आहे. भाजप हा जिल्ह्यातील सर्वात मोठा पक्ष असतानाही, मि त्रपक्षांना सोबत घेऊन जाण्याचा शब्द आम्ही पाळला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार महायुतीची एकजूट राखण्यात आम्हाला पूर्ण यश आले आहे. ही एकजूट केवळ राजकारणापुरती मर्यादित नसून जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी काळाची गरज आहे. नगरपालिका आणि पंचायत समितीप्रमाणेच जिल्हा परिषदेतही महायुतीची वाटचाल भक्कम राहिली आहे.

हा विजय म्हणजे सर्वसामान्य जनतेने महायुतीच्या कार्यपद्धतीवर दाखवलेला विश्वास असल्याचे सांगत आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्राआत्या पवार, पालकमंत्री प्रतापजी सरनाईक, आमदार तानाजी सावंत, माजी आम दार बसवराज पाटील, राहुल मोटे, ज्ञानराज चौगुले, सुजितसिंह ठाकूर, राजन साळवी, सुरेश बिराजदार, दत्ताभाऊ कुलकर्णी, नितीन काळे, महेंद्र धुरगुडे, अजित पिंगळे, मोहन पनुरे यांच्यासह महायुतीतील सर्व घटक पक्षाच्या नेत्यांचे, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचे आभार मानले आहेत.

# धाराशिव जिल्हा परिषदेचे सीईओ डॉ. मैनाक घोष यांची बदली

**धाराशिव :** जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष यांची बदली झाली असून त्यांची सांगलीच्या जिल्हाधिकारीपदी नियुक्ती करण्यात आली आहे. प्रियंवदा म्हाडदळकर यांची धाराशिव जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदावर नियुक्ती करण्यात आली आहे.

सामान्य प्रशासन विभागाचे सहसचिव यांच्या स्वाक्षरीने २७ मार्च रोजी त्यांच्या नियुक्तीचे आदेश निघाले. भारतीय प्रशासकीय सेवेत २०२२ मध्ये देशात १३ वा आणि महाराष्ट्रातून प्रथम क्रमांक मिळवणाऱ्या म्हाडदळकर यांनी मुंबई येथील व्हीजेटीआय अभियांत्रिकी महाविद्यालयातून इलेक्ट्रॉनिक्स विषयात पदवीचे शिक्षण पूर्ण केले असून त्यानंतर बेंगळुरू येथील आयआयएममधून फायनान्स विषयात एमबीए पदवी संपादन केली आहे. शैक्षणिकदृष्ट्या भक्कम पायाभूत तयारीनंतर त्यांनी केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत यश मिळवत प्रशासकीय सेवेत प्रवेश केला. प्रशासकीय कारकिर्दीच्या सुरुवातीच्या टप्प्यात त्यांनी जून २०२३ ते मे २०२४ या कालावधीत धाराशिव जिल्ह्यातच त्यांनी परिविक्षाधीन काळात सहाय्यक जिल्हाधिकारी म्हणून काम करताना स्थानिक प्रशासन, ग्रामीण विकास व विविध शासकीय योजनांची प्रभावी अंम लबजावणी यांचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. त्यानंतर त्यांनी दिल्ली येथे अर्थ मंत्रालयात सहाय्यक सचिव म्हणून काम पाहिले. आता धाराशिव जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारीपदी त्यांची नियुक्ती झाल्याने जिल्ह्यातील ग्रामीण विकास, पायाभूत सुविधा, शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक कल्याण योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीला गती मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# नळदुर्गच्या भुईकोट किल्ल्यासाठी सव्वा सात कोटी

## संवर्धन कामांना मंजुरी : ऐतिहासिक किल्ल्याचे रुप पालटणार | आमदार राणाजगजितसिंह पाटील यांची माहिती

**धाराशिव:** राज्यातील सर्वात मोठा भुईकोट किल्ला अशी ख्याती असलेल्या आणि मोठा ऐतिहासिक वारसा लाभलेल्या नळदुर्ग किल्ल्याच्या जतन आणि संवर्धनासाठी राज्य शासनाने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. 'नळदुर्ग किल्ला संवर्धन आणि स्थळ व्यवस्थापन आराखडा' या आराखड्यानंतर्गत पहिल्या टप्प्यातील कामांसाठी तब्बल ७ कोटी १८ लाख ९१ हजार ७९१ रुपयांच्या निधीला मंजुरी देण्यात आली आहे. कामाची निविदा प्रक्रियाही नुकतीच सुरू झाली आहे. त्यामुळे धाराशिव जिल्ह्याच्या पर्यटन व्यवसायाचा मानबिंदू असलेल्या ऐतिहासिक नळदुर्ग किल्ल्याचे रुप आता पालटणार असल्याचा विश्वास आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला आहे.

शासनाच्या पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालयाच्या छत्रपती संभाजीनगर विभागीय कार्यालयामार्फत हे काम पूर्ण केले जाणार आहे. या प्रकल्पामुळे दुर्लक्षित राहिलेल्या नळदुर्ग किल्ल्याला पुन्हा एकदा गतवैभव लाभणार आहे. नळदुर्ग किल्ल्याच्या या पहिल्या टप्प्यातील कामात अनेक महत्वाच्या बाबींचा समावेश करण्यात आला आहे. यात प्रामुख्याने तटबंदीचे संवर्धन हाती घेण्यात येणार आहे. किल्ल्याची ऐतिहासिक तटबंदी अनेक ठिकाणी कमकुवत झाली आहे, त्याचे शास्त्रोक्त पद्धतीने संवर्धन केले जाणार आहे. किल्ल्यातील झुडपे आणि राडारोडाही हटविण्यात येणार आहे. किल्ल्याच्या परिसरात आणि तटबंदीवर वाढलेली अनावश्यक झुडपे तसेच साचलेला राडारोडा पूर्णपणे साफ करण्यावर विशेष लक्ष देण्यात येणार आहे. देशभरातून तुळजाभवानी मातेच्या दर्शनासाठी येणारे लाखो भाविक आवर्जून या भुईकोट किल्ल्याला भेट देतात. आंध्रप्रदेश आणि कर्नाटक राज्यातून शिर्डीला दर्शनासाठी जाणारे भाविक आणि पर्यटकही अलीकडच्या काळात मोठ्या संख्येने किल्ला पाहण्यासाठी येत आहेत. पर्यटकांच्या सोयीसाठी आणि किल्ल्याचे सौंदर्य वाढवण्यासाठी स्थळ व्यवस्थापन आराखड्याची अंमलबजावणी पहिल्या टप्प्यात हाती घेण्यात आली असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.



पर्यटन व्यवसायाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मितीसाठी प्रयत्न कामाचा दर्जा राखण्यासाठी पुरातत्व विभागाच्या नियमांनुसार आणि तज्ज्ञ वास्तुविशारदांच्या मार्गदर्शनाखाली हे काम पूर्ण करण्याचे कंत्राटदाराला बंधनकारक असणार आहे. त्यामुळे पुढील दीड वर्षाच्या आत पर्यटकांना नळदर्ग किल्ल्याचे पालटलेले रूप पाहायला मिळणार असल्याचा विश्वास आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला आहे.या संवर्धन प्रकल्पामुळे नळदुर्ग किल्ला पर्यटनाच्या नकाशावर अधिक ठळकपणे येईल आणि स्थानिक पर्यटनाला मोठी चालना मिळणार आहे. पर्यटन व्यवसायाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मितीसाठी आपण सुरू केलेल्या प्रयत्नांना या कामामुळे आणखी दिलासा मिळणार असल्याचा दावाही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी केला आहे.

साप्ताहिक तेरणा वृत्तांत हे पत्र मालक, प्रकाशक व संपादक मल्हार राणाजगजितसिंह पाटील यांचे करिता प्रसाद संजय पवार, राजस्व प्रिंटिंग प्रेस, बुधवार पेठ, वडार गल्ली, सोलापूर, जि.सोलापूर ४१३००२ येथे मुद्रित केले व नरसिंह मंदिराजवळ, तेर, धाराशिव, महाराष्ट्र - ४१३५०९ येथे प्रकाशित केले.

# कोट्यवधींचे संकुल, पण गाळे रिकामेच!



ओंकार हिंगमिरे
बार्शी प्रतिनिधी

**बार्शी : शहरात नगरपालिकेच्या गाळ्यांचा प्रश्न अधिकच तीव्र झाला असून आता थेट मिळकत विभाग अधिकाऱ्यांच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. कोट्यवधींचा निधी खर्च करून उभारलेली व्यापारी संकुले आज पडून आहेत, मोठ्या प्रमाणावर गाळे रिकामे आहेत. एका बाजूला शहरात अतिक्रमण वाढत चालले आहे, तर दुसऱ्या बाजूला अधिकृत गाळे मूलभूत सोयीसुविधा आणि इतर अडचणीमुळे रिकामे आहेत.**

## मिळकत विभाग झोपेत, व्यापाऱ्यांचा आक्रोश टोकाला

गाळेधारकांनी भरलेली प्रचंड मोठी डिपॉझिट रक्कम आणि त्यावर आकारले जाणारे अवास्तव भाडे यामुळे नवीन व्यवसाय सुरू करणे म्हणजे आर्थिक जोखीम ठरत आहे. मिळकत विभागाकडून कोणतीही ठोस सवलत किंवा सुलभता दिली जात नसल्याने व्यापाऱ्यांमध्ये नाराजी वाढत आहे. ङडिपॉझिट भरायचं, भाडं द्यायचं, पण सुविधा काहीच नाहीतङ्क, अशी भावना गाळेधारकांमध्ये तीव्र आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयातील त्रिसदस्य समिती दर ठरवते, हे खरे असले तरी स्थानिक पातळीवर नगर परिषद आणि मिळकत विभाग अधिकारी यांची जबाबदारी टाळता येणार नाही. कारण प्रत्यक्ष अंमलबजावणी आणि गाळ्यांचे व्यवस्थापन हे याच यंत्रणेच्या हातात आहे. मग गाळे रिकामे का आहेत, याचा प्रामाणिक आढावा घेऊन उपाययोजना का केल्या जात नाहीत?


माजी आमदार राजेंद्र राऊत यांच्या कार्यकाळात मोठ्या आशेने उभारलेली ही व्यापारी संकुले आज निष्प्रभ ठरत आहेत. सुशिक्षित युवकांना स्थानिक पातळीवर व्यवसायाच्या संधी मिळाव्यात, हा उद्देश होता; पण आज उलट परिस्थिती निर्माण झाली आहे. पुणे, मुंबईकडे स्थलांतर करणाऱ्या युवकांची संख्या वाढत आहे, आणि बार्शीतील संधी रिकाम्या गाळ्यांसारख्या बंद दरवाज्यांआड अडकून पडल्या आहेत.

> विशेषतः टॉयलेट आणि बाथरूमच्या सुविधांची अत्यंत वाईट अवस्था आहे, तर पिण्याच्या पाण्याची कोणतीही व्यवस्था उपलब्ध नाही. प्रशासनाने प्रत्यक्ष जागेवर येऊन परिस्थिती पाहावी आणि तात्काळ उपाययोजना कराव्यात, अशी आमची मागणी आहे. – **संजयकुमार लोहिया** (गाळेधारक)




आता बार्शी नगर परिषदेवर सत्ताधारी आणि विरोधक दोघेही विकासाची भाषा बोलत आहेत. पण खरी गरज आहे ती कृतीची. सर्व नगरसेवक एकत्र येऊन ठराव करून जिल्हाधिकारी समितीकडे भाडे आणि डिपॉझिट कमी करण्याची मागणी करणार का? मिळकत विभाग अधिकारी पुढाकार घेऊन व्यापाऱ्यांना दिलासा देणार का? हा प्रश्न अनेकांना पडलेला आहे. सध्या गाळेधारकांची परिस्थिती अत्यंत बिकट झाली आहे. दिवसाचा खर्च भागवणेही कठीण होत असल्याने नगरपालिका गाडीपट्टी आणि भाडे वेळेवर भरणे शक्य होत नाही. त्यामुळे थकबाकी वाढत जाते आणि एकाच वेळी ती रक्कम भरण्याची इच्छाही होत नाही.

याचबरोबर, गाळेधारकांच्या मूलभूत सुविधा देण्याच्या बाबतीत नगरपालिका कायम दुर्लक्ष करते. मात्र, घरपट्टी किंवा इतर वसुलीच्या वेळी प्रशासन सर्वात पुढे असते. आमच्या गाळ्यांसमोर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झालेले आहे, तसेच पाण्याची सुविधा आणि स्वच्छतेचा पूर्ण अभाव आहे. परिसरात मोठ्या प्रमाणात घाण साचलेली असून, याकडे संबंधित विभागाचे अजिबात लक्ष नाही.




# गॅस टंचाई की काळाबाजार?

- बार्शीत सिलिंडर संकटाने नागरिक हैराण
- प्रशासन म्हणतं, अफवांपासून सावध राहा!

**बार्शी :** शहरात घरगुती गॅस सिलिंडरच्या टंचाईचा प्रश्न दिवसेंदिवस तीव्र होत असून नागरिकांचे दैनंदिन जीवन अक्षरशः विस्कळीत झाले आहे. भारत गॅस एजन्सी सलग तीन दिवस बंद राहिल्याने ग्राहकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. सिलिंडर मिळत नसल्यामुळे नागरिकांमध्ये संभ्रम, संताप आणि असंतोष वाढत चालला आहे.

प्रशासनाकडून 'अफवांवर विश्वास ठेवू नका' असे आवाहन करण्यात येत असले, तरी प्रत्यक्ष परिस्थितीत मात्र नागरिकांना गॅस मिळत नसल्याची वस्तुस्थिती नाकारता येत नाही. आखाती देशांतील तणावामुळे पुरवठ्यावर परिणाम झाल्याची चर्चा आहे, एजन्सी बंद असल्याने अनेक कुटुंबांची गैरसोय झाली आहे.

तहसीलदार एफ. आर. शेख यांनी संयम राखण्याचे आणि अधिकृत माहितीलाच महत्त्व देण्याचे आवाहन केले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून २४७ आपत्कालीन कक्ष सुरू करण्यात आला असून तक्रारींसाठी दूरध्वनी क्रमांकही जाहीर करण्यात आले आहेत. ही बाब सकारात्मक असली तरी त्या सुविधेचा प्रत्यक्ष लाभ नागरिकांना कितपत मिळतो, हा प्रश्न उपस्थित होत आहे.

दरम्यान, अनेक ग्राहकांनी गॅससाठी नंबर लावूनही अनेक दिवस उलटून गेले तरी सिलिंडर मिळालेला नाही. एजन्सीत चौकशीसाठी गेल्यावर ङघधउ केली आहे का?', 'तीन दिवसांनी या' किंवा 'तुमचा सिलिंडर दुसऱ्याला दिला असेल'अशा प्रकारच्या उत्तरांनी ग्राहकांची नाराजी अधिकच वाढत आहे.




अशा परिस्थितीत प्रशासनाने केवळ आवाहन करण्यापुरते मर्यादित न राहता पारदर्शक संवाद साधणे अत्यावश्यक आहे. गॅस एजन्सी बंद का आहे, पुरवठा कधी सुरळीत होणार आणि पर्यायी उपाययोजना काय आहेत, याबाबत स्पष्ट माहिती मिळाल्यास अफवांना आपोआप आळा बसेल.

> नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये. सर्व गोष्टी सुरळीतपणे चालू होणार आहेत आणि प्रशासन काळाबाजार करणाऱ्यांवर लक्ष ठेवून आहे आणि कोणी असं केल्यास त्याच्यावर कारवाई केली जाणार आहे. – **एफ. आर.शेख,** तहसीलदार, बार्शी

> गेल्या काही दिवसांपासून गॅससाठी सतत एजन्सीकडे फेऱ्या मारत आहोत, पण अजूनही सिलिंडर मिळालेला नाही. घरात स्वयंपाक करणेच कठीण झाले आहे. लहान मुलं, कुटुंब यांच्यासाठी रोजची जेवणाची सोय करणे मोठं आव्हान बनलं आहे. एजन्सीत विचारायला गेलं की ठोस उत्तर मिळत नाही, फक्त उद्या या, परवा या असंच सांगितलं जातं. – **प्रमिला बंडु पवार,** नागरिक

> ग्राहकांसाठी गॅस नाही मात्र ब्लॅक करायला गॅस आहे एजन्सी वाल्यांनी काळाबाजार चालू केला आहे. ग्राहकांना नंबरने गॅस देण्याऐवजी ऐवजी ब्लॅक ने देतात. ग्राहकांना देण्यासाठी यांच्याकडे साठा नाही मात्र ब्लॅक करायला साठा आहे. प्रशासनाने याकडे लक्ष द्यावे. – **विशाल गाडे,** नागरिक

# रिक्षाचालकाच्या मुलाची सुवर्ण झेप

## हॉर्टीकल्चर विषयात कृषी विद्यापीठात पटकावले सुवर्णपदक

**बार्शी :** जिद्द, कष्ट आणि कुटुंबाच्या त्यागाची साथ असेल तर कोणतेही स्वप्न अशक्य नसते, याचं हृदयस्पर्शी उदाहरण म्हणजे बार्शीचा चैतन्य निहालकुमार व्हनकळस. अत्यंत साध्या परिस्थितीत वाढलेल्या या तरुणाने आपल्या मेहनतीच्या जोरावर एमएस्सी (हॉर्टीकल्चर) व्हेजिटेबल सायन्स या विषयात विद्यापीठात प्रथम क्रमांक मिळवत 'बीएसएस सुरेश अग्रवाल सुवर्णपदक' पटकावले आहे.

राहुरी कृषी विद्यापीठात पार पडलेल्या ३९ व्या पदवीदान समारंभात राज्यपाल जिष्णू देव वर्मा आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते चैतन्यचा सन्मान करण्यात आला. हा क्षण केवळ एका विद्यार्थ्याच्या यशाचा नव्हे, तर एका संघर्षमय प्रवासाच्या यशस्वी शेवटाचा साक्षीदार ठरला.



चैतन्यचे वडील निहालकुमार व्हनकळस रिक्षा चालवून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. घरची परिस्थिती हलाखीची असतानाही त्यांनी मुलाच्या शिक्षणात कधीही अडथळा येऊ दिला नाही. आई रोहिणी, आजी कस्तुरबाई आणि भाऊ प्रविण यांनीही प्रत्येक टप्प्यावर त्याला खंबीर साथ दिली. त्यांच्या त्यागाचे सोनं करत चैतन्यने हे यश संपादन केले आहे.

बार्शीतील कर्मवीर मामासाहेब जगदाळे शैक्षणिक संकुलात त्याचे शालेय शिक्षण झाले. त्यानंतर बारामती येथील कृषी महाविद्यालयातून बीएस्सी (अॅग्री) पूर्ण करून त्याने एमएस्सी (हॉर्टीकल्चर) व्हेजिटेबल सायन्समध्ये प्रवेश घेतला. पहिल्याच वर्षी महाविद्यालयात प्रथम येत 'प्रतिभा पवार गोल्ड मेडल' पटकावणाऱ्या चैतन्यने दुसऱ्या वर्षातही आपली चमक कायम ठेवत अखेर विद्यापीठात अव्वल स्थान मिळवले.

चैतन्यचे यश हे केवळ त्याचं वैयक्तिक यश नसून, कष्टकरी कुटुंबातील प्रत्येक मुलासाठी आशेचा किरण आहे. 'परिस्थिती कितीही कठीण असली तरी स्वप्न मोठं असावं,' हा संदेश त्याने आपल्या यशातून संपूर्ण समाजाला दिला आहे.

बार्शी शहरासह परिसरातून चैतन्य आणि त्याच्या कुटुंबावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, अनेकांसाठी तो आज प्रेरणेचा दीप बनला आहे.

# जिल्ह्यातील एकही कुटुंब महिला बचत गटापासून वंचित राहू नये

## जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार; नवतेजस्विनी महोत्सवाचे उद्घाटन

**धाराशिव :** महिला बचत गटांच्या माध्यमातून जिल्ह्याचा विकासात्मक पालट होत असून या उपक्रमात केवळ संख्येपेक्षा गुणवत्तापूर्ण कामाला अधिक महत्त्व आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी केले.

महिला आर्थिक विकास महामंडळाच्या बचत गटांची संख्या जरी मोठी नसली तरी त्यांनी केलेले काम अत्यंत दर्जेदार आहे. महिला जिद्दीने व्यवसाय करून आर्थिक उलाढाल वाढवत आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील सर्व महिलांना बचत गटात समाविष्ट करून एकही कुटुंब या चळवळीपासून वंचित राहू नये, असे आवाहन त्यांनी २७ मार्च रोजी केले.





धाराशिव शहरातील शहर पोलीस स्टेशनजवळील उस्मानाबाद क्लब मैदानावर महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) च्या ५१ व्या वर्धापन दिनानिमित्त 'नवतेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्यम विकास प्रकल्प' अंतर्गत २७ ते २९ मार्च दरम्यान आयोजित नवतेजस्विनी महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राजकुमार मोरे,जिल्हा उद्योग केंद्राचे निरीक्षक साळुंके, प्रभारी महिला व बाल विकास अधिकारी किशोर गोरे, जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी महादेवी रणदिवे तसेच माविमचे जिल्हा समन्वय अधिकारी सुखदेव चिंचोलीकर आदी प्रामुख्याने उपस्थित होते.

# जनगणनेसाठी धाराशिव सज्ज !

**धाराशिव :** आगामी जनगणना-२०२७ संदर्भात राज्यातील सर्व शहरी व ग्रामीण भागात जनगणनेच्या पूर्वतयारीस सुरुवात झाली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात जनगणना पूर्वतयारीला गती देण्यात आली असून घर यादी व गृहगणना टप्प्यापासून डिजिटल जनगणनेपर्यंत सर्व प्रक्रिया टप्प्याटप्प्याने राबविण्यात येणार आहे. त्यासाठी चार्ज जनगणना अधिकारी (तहसीलदार व मुख्याधिकारी) यांच्या कार्यालयाच्या स्तरावर जनगणना कामकाजासाठी आवश्यक ते अधिकारी व कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

जनगणना-२०२७ च्या पहिल्या टप्प्यात घर यादी व गृहगणना ही मोहीम जिल्हास्तरावर व क्षेत्रीय कार्ययंत्रणेच्या स्तरावर प्रभावीपणे राबविण्यात येणार असून त्यासाठी धाराशिव जिल्ह्यात जनगणना - २०२७ चे कार्य पार पाडण्यासाठी आवश्यक ते मनुष्यबळ व संरचना निर्माण करण्यात आली आहे.



जनगणना पहिल्या टप्प्यासाठी जिल्ह्यात एकूण २८५० 'इन्शी लिस्टिंग ब्लॉक्स (HLB)' निश्चित करण्यात आले असून २ मास्टर ट्रेनर,५२ फील्ड ट्रेनर,२८५० गणनाकर्मी (Enumerators) आणि ६२ पर्यवेक्षक (Suervisors) यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. सर्व संबंधितांना जनगणना-२०२७ चे प्रशिक्षण देण्यासाठी जिल्ह्यात १८ प्रशिक्षण केंद्र निश्चित करण्यात आले आहेत.

जिल्हाधिकारी तथा प्रधान जनगणना अधिकारी, धाराशिव व जिल्हा जनगणना अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, धाराशिव यांच्या अधिनस्त जिल्हास्तरावर जनगणना कक्ष स्थापन करण्यात आला असून त्यामध्ये तहसीलदार-महसूल व तहसीलदार-(निवासी) यांची समन्वयक म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे. तसेच कक्षांतर्गत जनगणना कामकाजासाठी आवश्यक ते कर्मचारी उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

तसेच जनगणना-२०२७ च्या पहिल्या टप्प्यातील अंमलबजावणीसाठी जिल्ह्यातील सर्व चार्ज जनगणना अधिकारी (तहसीलदार व मुख्याधिकारी) यांच्या कार्यालयात जनगणना कक्ष स्थापन करण्यात आले असून त्यासाठी आवश्यक ते अधिकारी व कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

# येरमाळ्यात श्री येडेश्वरी देवीच्या चैत्र पौर्णिमा यात्रेची जय्यत तयारी

**येरमाळा : प्रसिद्ध श्री येडेश्वरी देवीच्या चैत्र पौर्णिमा यात्रेसाठी यंदा प्रशासनाने व्यापक तयारी केली आहे. २ एप्रिल ते ७ एप्रिल दरम्यान होणाऱ्या या यात्रेच्या पार्श्वभूमीवर उपविभागीय अधिकारी गणेश शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक पार पडली. या बैठकीत विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. यावेळी यात्रेच्या नियोजनाबाबत सखोल चर्चा करण्यात आली.**

दरवर्षीप्रमाणे यंदाही मोठ्या प्रमाणावर भाविकांची उपस्थिती अपेक्षित असल्याने आरोग्य, पाणी, वीज आणि सुरक्षा यावर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. यात्रास्थळी तात्पुरते आरोग्य केंद्र उभारून अतिरिक्त डॉक्टर व आरोग्य कर्मचारी तैनात केले जाणार आहेत. तसेच महावितरणकडून अखंडित वीजपुरवठा सुनिश्चित करण्यात येणार आहे.

यात्रेच्या वेळी सुरक्षा व्यवस्थेच्या दृष्टीने पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त राहणार असून पोलीस तसेच होमगार्डची मोठी फौज तैनात केली जाणार आहे. अवैध प्रकारांवर आळा घालण्यासाठी विशेष पथकेही कार्यरत राहतील.

याशिवाय स्वच्छता, वाहतूक नियंत्रण आणि भाविकांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत संबंधित विभागांना सूचना देण्यात आल्या आहेत. यात्रेचे नियोजन सुरळीत पार पाडण्यासाठी सर्व यंत्रणा सज्ज असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.



# पाण्याचे योग्य नियोजन आणि लोकसहभागातूनच धाराशिव जिल्हा समृद्ध होणार

## जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांचे प्रतिपादन | जागतिक जलदिन समारंभ व कार्यशाळेला प्रतिसाद

**धाराशिव : जिल्ह्यात जलसंधारण व जलव्यवस्थापनाच्या क्षेत्रात सर्वांनी एकत्रितपणे काम करण्याची गरज असून 'जिथे पाणी वाढते, तेथे समृद्धी वाढते' याच्या अनुषंगाने व्यापक विचारमंथन होणे आवश्यक आहे. पाण्याचे योग्य नियोजन व लोकसभागातून जिल्हा जलसमृद्ध होईल. असे प्रतिपादन जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी केले.**

मृद व जलसंधारण विभाग धाराशिव व मृद व जलसंधारण विभाग जिल्हा परिषद धाराशिव यांच्या संयुक्त वतीने सोमवारी जिल्हा नियोजन समिती सभागृह येथे संपूर्णतः अभियान २.० अंतर्गत आयोजित जागतिक जलदिन समारंभ व कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानावरून पुजार बोलत होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष, जल योद्धा हनुमंत केंद्रे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राजकुमार मोरे, धाराशिव पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता मदने, जिल्हा जलसंधारण अधिकारी प्रभाकर महामुनी, जिल्हा परिषदेचे जलसंधारण अधिकारी चंद्रकांत राऊळ, जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता कटकधोंड, धाराशिव सारथी जि प शेतकरी उत्पादक कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक विकास गोडसे व स्वयं शिक्षण प्रयोग संस्थेच्या मार्गदर्शक श्रीमती. वैशाली घुगे यांची उपस्थिती होती.




जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार पुढे म्हणाले की, पाण्याचे महत्त्व ओळखून प्रत्येकाने आपल्या स्तरावर नियोजन करून त्याची प्रभावी अंमलबजावणी केली पाहिजे. पूर्वी महिलांना डोक्यावर हंडा घेऊन दूरवरून पाणी आणावे लागत होते, मात्र आज 'हर घर जल' योजनेमुळे अनेक गावांमध्ये घरापर्यंत स्वच्छ पाणी पोहोचत असल्याचे समाधानकारक चित्र दिसत आहे.ही सकारात्मक बदलाची दिशा कायम ठेवण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे, असे पुजार म्हणाले.

जिल्ह्यात दर तीन वर्षांनी दुष्काळी परिस्थिती निर्माण होत असल्यामुळे धरणे, कालवे, बंधारे यांसारख्या प्रकल्पांबरोबरच स्थानिक स्तरावर पाणी साठवणूक आणि पुनर्भरणावर भर देणे आवश्यक आहे असे सांगून पुजार म्हणाले की, प्रत्येकाने आपल्या घराजवळ सांडपाण्याचा निचरा करण्यासाठी शोषखड्डे तयार केल्यास भूगर्भातील पाण्याची पातळी वाढण्यास मदत होईल. 'जलयुक्त शिवार' योजनेसह विविध शासकीय योजनांद्वारे जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात जलसंधारणाची कामे सुरू आहेत. नीती आयोग व जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून रिचार्ज शाफ्टसारखी कामे करून पाणीटंचाईग्रस्त गावांना दिलासा देण्याचे प्रयत्न सुरू असून, यामुळे भविष्यात दुष्काळमुक्ती साध्य होण्यास मदत होणार आहे.असे त्यांनी सांगितले.

पुजार पुढे म्हणाले की, जिल्ह्याचा मुख्य व्यवसाय शेती असून पाण्याचे योग्य नियोजन केल्यास उत्पादनात मोठी वाढ होऊ शकते. जिल्ह्याचे दरडोई उत्पन्न वाढून २ लाख १० हजार रुपये झाले आहे. शेतकऱ्यांच्या परिश्रमाला पाण्याचे योग्य व्यवस्थापन जोडले तर समृद्धीचा मार्ग अधिक मजबूत होईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

डॉ. घोष म्हणाले की, पाण्याची जबाबदारी केवळ महिलांवर सोपविणे योग्य नाही. स्थानिक स्वराज्य संस्था,ग्राम सभा आणि नागरिकांनी एकत्रितपणे या प्रश्नावर उपाय शोधणे गरजेचे आहे. ग्रामसभेत महिलांनी सक्रिय सहभाग घेतल्यास समस्यांचे प्रभावी निराकरण होऊ शकते. दुष्काळामुळे मुला-मुलींना पाणी आणण्याची जबाबदारी पार पाडावी लागते,ज्याचा त्यांच्या आरोग्य व शिक्षणावर विपरीत परिणाम होतो.त्यामुळे जलव्यवस्थापनात सर्व घटकांचा सहभाग आवश्यक आहे.असे ते म्हणाले. इतर मान्यवरांनी देखील यावेळी जलसंवर्धनाचे महत्व सांगून पाणी बचतीचा संदेश दिला. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन व जल पूजन करण्यात आले. यावेळी उपस्थितांना जल प्रतिज्ञा देण्यात आली. कार्यक्रमास जिल्ह्यातील महिलांची लक्षणीय उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपविभागीय जलसंधारण अधिकारी श्रीमती. सायली जाधव यांनी केले.




## तुळजापुरात

# अद्यावत वातानुकूलित नाट्यगृह उभारणार !

### 'पंचरंग करंडक' एकांकिका लेखन स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळ्यात आमदार राणाजगजितसिंह पाटील यांचे प्रतिपादन

**तुळजापूर :** कुलस्वामिनी तुळजाभवानी मातेच्या तुळजापूर शहराला लाभलेला ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा अधिक समृद्ध करण्यासाठी, तसेच स्थानिक कलाकारांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देण्यासाठी तीर्थक्षेत्र तुळजापूर येथे लवकरच सर्व सोयींनी युक्त असे पूर्णतः वातानुकूलित भव्य आणि अद्यावत नाट्यगृह उभारणार असल्याची अशी ग्वाही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे. त्यामुळे तुळजापूर आणि परिसरातील नाट्य चळवळीला मोठी उभारी मिळेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

'पंचरंग प्रतिष्ठान' आयोजित 'श्री क्षेत्र तुळजापूर राज्यस्तरीय पंचरंग करंडक एकांकिका लेखन स्पर्धा २०२५-२६' चा पारितोषिक वितरण आणि निवडक एकांकिकांच्या 'अंकुर' या संग्रहाचा प्रकाशन सोहळा हॉटेल स्कायलँड येथे अत्यंत उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाला आमदार पाटील यांनी ऑनलाईन माध्यमातून उपस्थित राहून नवोदित लेखकांच्या सृजनशीलतेचा गौरव केला.

यावेळी बोलताना आमदार राणाजगजितसिंह पाटील म्हणाले, आई तुळजाभवानीच्या पावन भूमीत साहित्याचा जागर होणे ही अभिमानास्पद बाब आहे. या स्पर्धेच्या निमित्ताने निवडक एकांकिका संहितांचा 'अंकुर' हा संग्रह पुस्तक स्वरूपात प्रकाशित करण्यात आला. नवोदित लेखकांना संधी उपलब्ध करून देऊन दर्जेदार नाट्य साहित्य रंगभूमीपर्यंत पोहोचवणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. तुळजापूरची ही साहित्यिक आणि सांस्कृतिक पताका अशीच उंच फडकत राहणार असल्याचे सांगत आमदार पाटील यांनी आयोजक, पंचरंग प्रतिष्ठानच्या कामाचे यावेळी कौतुकही केले.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील मराठी विभाग प्रमुख, ख्यातकीर्त सिने गीतकार तथा प्रसिद्ध कवी व नाट्य लेखक प्रा. डॉ. दासू वैद्य उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीने सोहळ्याची उंची अधिकच वाढली. व्यासपीठावर तुळजापूरचे नगराध्यक्ष श्री. विनोद पिटू गंगणे, उपनगराध्यक्ष श्री. रामचंद्र आबा रोचकरी, प्रसिद्ध अभिनेते श्री. उमेश जगताप, श्री. शंतनू गंगणे यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी पंचरंग प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्रीकांत आप्पा नाडापुडे, सचिव प्रा. संभाजीराव भोसले, उपाध्यक्ष सचिन घोडके, स्पर्धा संयोजक महेश धुमाळ आणि दिग्विजय भोसले यांच्यासह नाट्य व साहित्य क्षेत्रातील रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सर्व विजेत्या लेखकांचे आणि 'अंकुर' संग्रहात स्थान मिळवलेल्या साहित्याचे यावेळी मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले. तसेच विविध क्षेत्रात लौकिकस्पद कामगिरी बजावल्याबद्दल सरोजा नरेश अमृतराव, नीता दिनेश क्षीरसागर डॉ. शिवतेज संभाजी भोसले, डॉ. निविता नारायण नन्नवरे कु. सृष्टी धनंजय पाटील, प्रा. ऋतुजा अनिल रोचकरी, चि. कासिफ ख्वाजा सय्यद, श्री. स्वप्नील ऋषीकांत भोसले, डॉ. रिया राजेश शिंदे, कु. भक्ती सुधाकर उळेकर, चि. शिवतेज सुधाकर उळेकर, चि. तुषार तुळसीदास साखरे, कु. आदिती सचिन घोडके, चि. रुहान शंतनू गंगणे, कु. श्रुती राजेश चोपदार, चि. आयुष राजेश जगताप वरील सर्व मान्यवरांचा जाहीर सत्कार करण्यात आला.

## तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयात

# फार्मसी विद्यार्थ्यांसाठी आर्टिफिशियल इंटेलिजन्स टूल्स प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न

**धाराशिव :** आर्टिफिशियल इंटेलिजन्सचे औषधी निर्मिती व आरोग्य क्षेत्रात वाढणारे महत्त्व पाहून धाराशिव शहरातील नामांकित तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयात फार्मसी विद्यार्थ्यांसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (आर्टिफिशियल इंटेलिजन्स) टूल्स संदर्भात दिनांक १७ ते १९ मार्च २०२६ दरम्यान तीन दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.




या प्रशिक्षणासाठी संभव फाउंडेशन, बेंगळुरू येथील प्रशिक्षक श्री. रोहन घाडगे यांनी मार्गदर्शन केले. प्रशिक्षणामध्ये आर्टिफिशियल इंटेलिजन्स चा दैनंदिन जीवनातील उपयोग, आरोग्य,कृषी, पर्यावरण ,औषध निर्मिती शैक्षणिक यासारख्या क्षेत्रातील वापर तसेच करिअर आणि उद्योग क्षेत्रातील महत्त्व याविषयी सविस्तर माहिती देण्यात आली.

यावेळी विद्यार्थ्यांना जनरेटिव्ह आर्टिफिशियल इंटेलिजन्स टूल्स, एजेंटिक आर्टिफिशियल इंटेलिजन्स टूल्स तसेच रिझ्युमे बिल्डिंगसाठी वापरल्या जाणाऱ्या आर्टिफिशियल इंटेलिजन्स टूल्सचे प्रात्यक्षिकासह प्रशिक्षण देण्यात आले.

या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विक्रमसिंह माने यांनी सांगितले की, आर्टिफिशियल इंटेलिजन्स चे शिक्षण हे केवळ अभियांत्रिकी विद्यार्थ्यांसाठी मर्यादित नसून सर्वच क्षेत्रातील विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त आहे. फार्मसी क्षेत्रातही त्याचा उपयोग व मोठा फायदा होऊ शकतो.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे ट्रेनिंग प्लेसमेंट ऑफिसर प्रा.अशोक जगताप, फार्मसीचे ट्रेनिंग प्लेसमेंट ऑफिसर प्रा.जी.बी. चिवटे, विभागप्रमुख डॉ. पी. टी. माने व त्यांच्या सहकारी टीमने विशेष परिश्रम घेतले. हे तीन दिवसीय प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी या प्रशिक्षणाचा भविष्यात आम्हाला फायदा होईल असा विश्वास व्यक्त केला.

# २८, २९ व ३१ मार्च रोजी कोषागार व बँका उशिरापर्यंत सुरू राहणार

## जिल्हाधिकाऱ्यांचा आदेश

**धाराशिव :** वित्तीय वर्ष २०२५-२६ मधील सर्व शासकीय आर्थिक व्यवहार दिनांक ३१ मार्च २०२६ पर्यंत पूर्ण करणे आवश्यक असल्याच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी बँकांसाठी आदेश जारी केला आहे. या आदेशानुसार २८ मार्च, २९ मार्च आणि ३१ मार्च २०२६ रोजी कोषागार कार्यालये व बँकांचे कामकाज उशिरापर्यंत सुरू ठेवण्यात येणार आहे.

जिल्हा कोषागार अधिकारी, धाराशिव यांच्या दि.१६ मार्च २०२६ च्या पत्रानुसार महाराष्ट्र शासन, वित्त विभागाच्या दि.१३ मार्च २०२६ च्या परिपत्रकान्वये यावर्षी २८ मार्च (शनिवार),२९ मार्च (रविवार) आणि ३१ मार्च (महावीर जयंती) हे दिवस सार्वजनिक सुट्टीचे आहेत. मात्र मार्च अखेरीस कोषागारात मोठ्या प्रमाणावर देयके सादर होण्याची शक्यता लक्षात घेऊन या दिवशीही कोषागारे व बँका कार्यरत ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच ३१ मार्च २०२६ रोजी शासकीय देयके केवळ ए-र्घीलशी झरूशपीं चेवश द्वारेच अदा करण्यात येणार आहेत. त्या दिवशी कोषागारात सादर होणाऱ्या देयकांचे भुगतान रात्री १२ नंतरही धनादेशाद्वारे न करता ई-कुबेर प्रणालीमार्फतच करण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

शासनास जमा करावयाच्या रकमा शासकीय लेख्यात वेळेत जमा व्हाव्यात यासाठी जिल्ह्यातील सर्व राष्ट्रीयकृत बँकांनी कोषागार कार्यालयाचे व्यवहार पूर्ण होईपर्यंत आपले कामकाज सुरू ठेवणे आवश्यक असल्याचेही निर्देश देण्यात आले आहेत.

# खरीप २०२० पीक विम्याचे पैसे वाटपासाठी 'विशेष खाते' उघडण्यास मंजुरी

## जिल्ह्यातील शेतकरी बांधवांसाठी दिलासादायक निर्णय : आमदार राणाजगजितसिंह पाटील



**धाराशिव जिल्ह्यातील शेतकरी बांधवांना २०२० साल खरीप हंगामातील पीक विमा परताव्याचा मार्ग आता मोकळा झाला आहे. राज्य शासनाच्या कृषी विभागाने मंगळवार २४ मार्च रोजी एक महत्त्वाचा शासन निर्णय निर्गमित केला आहे. पात्र शेतकरी बांधवांना नुकसान भरपाईचे वाटप करण्यासाठी 'वैयक्तिक ठेव खाते' उघडण्यास विशेष बाब म्हणून आपल्या महायुती सरकारने आता मान्यता दिली आहे. जिल्ह्यातील शेतकरी बांधवांसाठी हा मोठा दिलासादायक निर्णय असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले आहे.**

खरीप २०२० च्या पीक विम्याबाबत मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठात याचिका दाखल करण्यात आली होती. त्यावर न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार, शेतकऱ्यांना विम्याची रक्कम अदा करण्यासाठी धाराशिवच्या जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांच्या नावाने स्वतंत्र खाते उघडण्याची आवश्यकता होती.

१३४ कोटींहून अधिकचा निधी आपल्या महायुती सरकारने उपलब्ध करुन दिला आहे. जिल्ह्यातील पात्र शेतकरी बांधवांच्या बँक खात्यात थेट पैसे जमा करण्यासाठी शासनाने निधीची व्यवस्था केली आहे. त्यानुसार प्रधानमंत्री पीक विमा योजनेचा प्रलंबित राज्य हिस्सा म्हणून १३४ कोटी ११ लाख ९१ हजार ९३८ रुपये वितरित करण्यात आले आहेत. न्यायालयाकडून मिळालेली व्याजासह रक्कम देखील याच खात्यात जमा केली जाणार असल्याचे आमदार पाटील यांनी म्हटले आहे.

हे विशेष खाते स्टेट बँक ऑफ इंडियामध्ये उघडले जाणार असून, त्याबाबत शासनाने कडक अटी घातल्या



आहेत. हे खाते पुढील तीन वर्षांसाठी म्हणजे सन २०२५-२६ ते २०२७-२८ वैध असणार आहे. या खात्यातून होणारा खर्च केवळ खरीप २०२० वर्षामधील पात्र शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यासाठीच केला जाणार आहे. या खात्याचे नियमित ऑडिट केले जाईल आणि दरमहा जिल्हा कोषागार कार्यालयाशी मेळ घातला जाईल. तसेच या खात्याचे वर्गीकरण 'नागरी ठेव' या अंतर्गत करण्यात आले आहे.

### न्याय मिळेपर्यंत अखंड प्रयत्न करणार : आमदार राणाजगजितसिंह पाटील

शासनाच्या या निर्णयामुळे आता धाराशिवच्या जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालय तातडीने हे खाते कार्यान्वित करेल. नागपूर येथील महालेखापाल कार्यालयाकडून त्याबाबतचे प्राधिकारपत्र प्राप्त होताच, शेतकऱ्यांच्या खात्यात विम्याचा दुसरा हप्ता आणि इतर रक्कम जमा करण्याची प्रक्रिया सुरू केली जाईल. १६ मार्च व २३ मार्च रोजी या प्रकरणाची सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. यावेळी आपले वकील ॲड. सुधांशु चौधरी तसेच राज्य व केंद्र सरकारचे वकील उपस्थित होते. या विषयावर आपले व्यक्तिशः संपूर्ण लक्ष असून शेतकऱ्यांना न्याय मिळेपर्यंत आपले प्रयत्न अखंडपणे सुरूच राहतील असे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले आहे.